# महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ,
शासकीय तंत्र निकेतन इमारत ,क विभाग,४९ खेरवाडी,
वांद्रे (पूर्व),मुंबई -४०००५१.

दूरध्वनी क्रमांक-०२२-२६४७४४३५ ,ई-मेल- msbve2003@yahoo.com व संकेतस्थळ www.msbve.gov.in

जा.क्र.मराव्यशिपमं/मान्यता/का-१/२०२०/ ४८८ दिनांक -१६/३/२०२०

*ई-मेलद्वारे रवाना*

प्रति,
जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी (सर्व)

विषय–<u>महाराष्ट्र राज्य,व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ,मुंबई</u>
सत्र २०२०-२१ या शैक्षणिकवर्षातील online मान्यता प्रक्रिया कार्यक्रमास मुदतवाढ देणेबाबत.

संदर्भ–१)मंडळाचे पत्रक्रमांकमराव्यवशिपमं/का-१/मान्यताविभाग/२०२०/४०,दि.१०/१/२०२०.
२)मंडळाचे पत्रक्रमांकमराव्यवशिपमं/का-१/मान्यताविभाग/२०२०/१२०,दि.२९/१/२०२०.
३)मंडळाचे पत्रक्रमांकमराव्यवशिपमं/का-१/मान्यताविभाग/२०२०/२२४,दि.२८/२/२०२०.
४)मंडळाचे पत्रक्रमांकमराव्यवशिपमं/का-१/मान्यताविभाग/२०२०/२२७,दि.०२/३/२०२०.
५)मंडळाचे पत्रक्रमांकमराव्यवशिपमं/का-१/मान्यताविभाग/२०२०/२७७,दि.११/३/२०२०.

उपरोक्त विषयाबाबत संदर्भांकित पत्रांच्या अनुषंगाने जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांना कळविण्यात येतेकी, सत्र २०२०-२१ या शैक्षणिक वर्षातील मान्यता प्रक्रिया कार्यक्रमास दिनांक ३१/०३/२०२० पर्यंत मुदत वाढ देण्यात येत असून सुधारित कार्यक्रमाचा गोषवारा या सोबत जोडण्यात आहे.

सर्व स्तरातील लोकांना तसेच विद्यार्थ्यांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने online अर्ज समाविष्ट करण्याच्या दिनांकास मुदतवाढ देण्यात आली असून त्यासाठी मंडळाचे मा.अध्यक्ष साहेब यांनी व्हिडीओ कॉन्स्फ्ररंस द्वारा आवाहन केल्यानुसार मंडळाचे कौशल्यपूर्ण अभ्यासक्रम राबविण्यासाठी जास्तीस जास्त संस्थांना online अर्ज भरण्याकरिता प्रोत्साहित करावे.

मागील वर्षी मान्यताप्राप्त असलेल्या बहुतांशी संस्थांनी अद्यापपर्यंत नूतनीकरण करणे करिता अर्ज समविष्ट केलेले नाहीत असे मंडळाकडील प्राप्त आकडेवारीवरून निदर्शनास येत आहे सदर संस्थांनी दिनांक ३१/०३/२०२० पर्यंत अर्ज समाविष्ट न केल्यास त्यांना देण्यात आलेली मान्यता रद्द समजण्यात येईल व अश्या संस्थांना सत्र २०२१-२२ या शैक्षणिक वर्षात नव्याने मान्यता घ्यावी लागेल बाबतचे पत्र संबंधित संस्थांना जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांच्या मार्फत निर्गमित करण्यात यावे.

मा.अध्यक्षांच्या मान्यतेने,

सचिव,
व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ,
महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत-.

१.मा.संचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य (का-८),३,महापालिकामार्ग,मुंबई-१.
२.सहसंचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,प्रादेशिक कार्यालय, मुंबई/पुणे/नासिक/औरंगाबाद/ अमरावती /नागपूर
३.श्री.तुषार पाटील ,कंपास मॅनेजमेंट यांना पुढील कार्यवाही करिता.

महाराष्ट्र राज्य,व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ

प्रमाणपत्र अभ्यासक्रम मान्यता प्रक्रिया राबविण्यासाठी करावयाच्या

कार्यवाही कार्यक्रमाचा गोषवारा(सुधारित)

मान्यता प्रक्रिया २०२०-२१

| अ.क्र. | online मान्यता प्रक्रिया तपशील | कालावधी |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळाचे नवीन प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु करणे ,तुकडीवाढ व जुन्या संस्थेत नवीन प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु करणे व नुतनीकरण मान्यता या करिता इच्छुक संस्थाकडून online अर्ज मागविणे. | १/१/२०२० ते २८/२/२०२० पर्यंत<br>**मुदतवाढ दिनांक-३१.३.२०२० पर्यंत** |
| २ | संस्थेने नमूद करावयाचा निरीक्षण दिनांक व कालावधी | ०५/४/२०२० पर्यंत |
| ३ | online प्राप्त अर्जानुसार संस्थांचे निरीक्षण करणे | १५/४/२०२०पर्यंत * |
| ४ | संबंधित समितीने निरीक्षण अहवाल अपलोड करणे | २०/४/२०२० पर्यंत |
| ५ | जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालयाने समितीचा निरीक्षण अहवाल शिफारस करून अपलोड करणे | २५/४/२०२० पर्यंत |
| ६ | मंडळाकडून LOA प्रदान करणे | १०/५/२०२०पर्यंत |
| ७ | LOA प्राप्त संस्थांनी अनामत रक्कमचे चलन अपलोड/ make payment करणे | १५/५/२०२० पर्यंत |
| ८ | मंडळाकडून LOSA प्रदान करणे | २०/५/२०२० पर्यंत |
| ९ | LOA नाकारण्यात आलेल्या संस्थेने पुन:निरीक्षणासाठीचे प्रक्रिया शुल्क online भरणा करणे. | १०/५/२०२० पर्यंत |
| १० | मंडळ स्तरावर ONLINE तक्रारीचे निवारण करणे | १/६/२०२० ते १५ /६/२०२०पर्यंत |
| ११ | मंडळाने LOA व LOSA प्रदान प्रक्रिया पूर्ण करणे. | १५/६/२०२० ते १५/७/२०२०पर्यंत |
| १२ | संस्थांनी विद्यार्थी प्रवेश प्रक्रिया पूर्ण करून नोंदणी अर्जासह नोंदणी फी चे चलन जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालयाकडे जमा करणे . | १५/७/२०२० ते ३१/७/२०२०पर्यंत |
| १३ | शैक्षणिक सत्र २०२०-२१ ला सुरुवात करणे | १/८/२०२० रोजी |

* संस्थेकडे साधनसामुग्री उपलब्ध असल्यास व निरीक्षणाला सामोरे जाण्याची संस्थेची तयारी असल्यास निरीक्षणासाठी अर्ज केल्याच्या दिनांकापासून पुढे १०दिवसानंतर सुद्धा निरीक्षण करून घेता येईल.

सचिव,
महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण
परीक्षा मंडळ, मुंबई.